# वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेट्रो मार्ग बांधण्यास मेट्रो-३ उत्सुक

मुंबई : जयंत होवाळ

एमएमआरडीएच्या अखत्यारीतील वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हा मेट्रो मार्ग- ११ उभारण्यासाठी मुंबई मेट्रो रेल्वे कोर्पोरेशनने इरादा जाहीर केला असून तसा प्रस्ताव एमएमआरडीएला सादर केला आहे. हा मार्ग वडाळा-घाटकोपर-ठाणे- कासारवडवली मेट्रो-४ चा विस्तार आहे. मेट्रो ११ मार्गात ७ भूमिगत, तर ४ उन्नत स्थानके असतील.

मुंबई मेट्रो रेल्वे कोर्पोरेशन सध्या कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ मार्गाची उभारणी करत आहे. हा मार्ग पूर्णपणे भूमिगत आहे. मेट्रो ११ मार्गात ७ स्थानके भूमिगत असून भूमिगत मेट्रो बांधण्याचा मेट्रो ३ चा अनुभव लक्षात घेता मेट्रो ११ साठी कॉर्पोरेशनने स्वारस्य दाखवल्याचे समजते.

मेट्रो ११ मार्गाचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार झाला तेव्हा प्रकल्पाचा एकूण खर्च ८७३९ कोटी रुपये गृहीत धरला होता. २०१९ साली या प्रकल्पाचे काम सुरु होणार होते. तीन वर्षानंतर अर्थातच प्रकल्पाचा खर्च वाढल्याची शक्यता आहे. त्यामुळे वाढीव खर्चाचा अंदाज बांधून एमएमआरडीएला मेट्रो ३ ला सुधारित अंदाज द्यावा लागेल. अद्याप तरी एमएमआरडीएकडून मेट्रो ३ ला प्रतिसाद मिळालेला नाही.

मेट्रो ११ च्या मूळ प्रकल्प

## एमएमआरडीएला प्रस्ताव सादर

अहवालात २ उन्नत, तर ८ भुयारी स्थानके प्रस्तावित होती. मेट्रो कॉर्पोरेशनच्या प्रस्तावात स्थानकांच्या संखेत आणि रचनेत बदल करण्यात आला आहे. हा मार्ग पूर्वी वडाळा ते जनरल पोस्ट ऑफिस असा प्रस्तावित होता. नंतर मात्र हा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंत नेण्याचे ठरले. मेट्रो ११ चा वडाळा ते शिवाजी महाराज टर्मिनस हा टप्पा मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेतून जाणार आहे.

- एमएमआरडीएकडे सध्या प्रकल्पांची भाऊगर्दी झाली आहे. मुंबई व परिसरात १३ मेट्रो प्रकल्प राबवले जात आहेत. त्याशिवाय उड्डाणपूल बांधण्याची कामेही सुरू आहेत. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर एमएमआरडीएने ठाणे जिल्ह्यात विकासकामे राबवण्यासाठी तब्बल १७ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या निधीतून या जिल्ह्यात मोठी कामे हाती घेतली जाणार असून त्याची जबाबदारीही एमएमआरडीएकडे आहे. त्यामुळे एमएमआरडीए भूमिगत मार्गाचा अनुभव असलेल्या मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडे मेट्रो ११ ची जबाबदारी देण्याची शक्यता आहे.



वडाळ्यापुढे कासारवडवली मार्ग ३२.३२ किमीचा असून त्यासाठी १४ हजार ५४९ कोटी रुपये खर्च आहे. या प्रकल्पाचे काम सुरु आहे. मार्ग पूर्णपणे उन्नत आहे. एकुणच मेट्रो ११, मेट्रो ४ हा मार्ग काही टप्प्यात उन्नत तर काही टप्प्यात भूमिगत असेल. मेट्रो ३ नंतर काही प्रमाणात भूमिगत असणारा हा मुंबईतील दुसरा मार्ग असेल. मेट्रो ४ चा मुंबईच्या दिशेने वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, तर ठाण्याच्या दिशेने कासारवडवली ते गायमुख असा असेल.